

# आठ विधानसभा मतदारसंघात आज मतदान

**160** उमेदवार | **25,46,458** मतदार | **2708** मतदान केंद्र



*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.19 )- जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांत आज बुधवारी ( दि.20 ) मतदान होत आहे. सकाळी सात वाजतापासून मतदान प्रक्रिया सुरू होणार आहे. यासाठी सर्व मतदारसंघात प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे. मेळघाटसह अमरावती, तिवसा, दर्यापूर,अचलपूर, धामणगाव रेल्वे, मोर्शी, बडनेरा मतदारसंघात एकूण 2708 केंद्रावर मतदान होणार असून मतदारांची संख्या एकूण 25,46,458 एवढी आहे.प्रत्यक्ष किती मतदान या निवडणुकीत होते,याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.सर्व मतदारसंघात एकूण 160 उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. मेळघाट मतदारसंघातील केंद्रांवर निवडणूक पथक सोमवारी रवाना झाले आहे. तर उर्वरित सात विधानसभा मतदारसंघाकरिता मंगळवारी ( दि.19 ) निवडणूक पथक रवाना झाले.*

मतदान प्रक्रियेसाठी असलेल्या पथकात 2708 मतदान केंद्राध्यक्ष,8124 मतदान अधिकारी असे एकूण 10832 कर्मचारी तसेच याशिवाय 1089 राखीव कर्मचारी राहणार आहे. सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधांची निर्मिती करण्यात आलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारीदेखील केंद्रांवर मतदारांच्या सहकार्यासाठी राहणार आहे. सर्व मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. मतदान प्रक्रियेदरम्यान निवडणूक विभाग, पोलीस यंत्रणा यांची स्थिर आणि फिरती पथके अधिक सक्रिय राहणार आहेत. उमेदवार, राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या हालचालीवरही त्यांची नजर राहणार आहे.



## मद्यविक्री करण्यास बंदी

निवडणूक कालावधीत 18 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 ते 20 नोव्हेबरचा मतदानाचा संपुर्ण दिवस तसेच, 23 नोव्हेबर मतमोजणीचे दिवशी अमरावती आयुक्तालय, कार्यक्षेत्रात सर्व प्रकारच्या मद्यविक्री करण्यास बंदी करण्यात आलेली आहे. यादरम्यान, अवैध व्यवसाय व दारु विक्री करणाऱ्याविरुध्द प्रचलित कायद्यान्वये प्रभावी कार्यवाही करण्यात येणार आहे.

## विधानसभा निहाय मतदार संख्या

| विधानसभा | मतदार | मतदान केंद्र |
|---|---|---|
| धामणगांव रे. | 3,17,856 | 378 |
| बडनेरा | 3,63,825 | 348 |
| अमरावती | 3,74,458 | 345 |
| तिवसा | 2,96,495 | 319 |
| दर्यापुर | 3,08,445 | 342 |
| मेलघाट | 3,02,029 | 356 |
| अचलपुर | 2,92,241 | 309 |
| मोर्शी | 2,91,109 | 311 |
| एकूण | 25,46,458 | 2682 |

## 1656 मतदान केंद्रांवर वेब कास्टिंगद्वारे नजर

2708 मतदान केंद्रांपैकी 1656 मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून वेब कास्टिंगद्वारे जिल्हाधिकारी यांची नजर राहणार आहे. यामध्ये चार अतिसंवेदनशील मतदान केंद्रांचादेखील समावेश आहे. मतदान केंद्रांवर 11 हजार 919 कर्मचारी तर 3873 पोलीस कर्मचारी, 2477 होमगार्ड आणि एसआरपीएफ आणि सीआरपीएफच्या प्रत्येकी 8 प्लाटून कंपनी तैनात राहणार आहे. याशिवाय जाहीर प्रचार करणाऱ्यांवर देखील प्रशासनाची नजर राहणार आहे.

## 7 विद्यमान आमदारांसह 4 माजी आमदार रिंगणात

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात 160 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये सात विद्यमान आमदारांसह चार माजी आमदार देखील निवडणूक लढवत आहेत. जिल्ह्यात काँग्रेस आणि भाजप प्रत्येकी 5, प्रहार 4, अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शिवसेना ठाकरे गट, युवा स्वाभिमान प्रत्येकी 2 तसेच, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि मनसे प्रत्येकी 1 जागेवर लढत आहेत.तर बसपा आणि वंचित यांनी सर्व 8 जागांवर उमेदवार दिले आहेत.

## विधानसभा निवडणुकीसाठी अमरावती पोलीस अलर्ट

20 नोव्हेबर रोजीच्या विधानसभा निवडणुकीसाठी अमरावती पोलिस अलर्ट झाली असून, या अनुषंगाने 1724 पोलिस अधिकारी, कर्मचारी, सीआरपीएफ, एसआरपीएफ यांच्यासह होमगार्ड तैनात करण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालय अमरावती शहर हद्दीमध्ये एकुण 4 विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. धामणगांवातील 5 मतदान केंद्र, बडनेरातील 344 मतदान केंद्र, अमरावतीमधील 345 मतदान केंद्र, तिवसातील 97 मतदान केंद्राचा विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. 20 नोव्हेबर रोजी विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया राबविली जाणार आहे. निवडणुक बंदोबस्ताकरीता अमरावती शहर येथे 1724 पोलीस अधिकारी व अंमलदार नेमण्यात आलेले आहे. तसेच,बाहेरुन प्राप्त सीआरपीएफ, एसएपी, एसआरपीएफ, बीएसएफ अशा कंपन्या व मध्यप्रदेश येथुन 500 व अमरावती येथून 100 होमगार्डस् तैनात राहणार आहे. सदर कंपनीचा स्ट्रॉग रूम, ईव्हीएम सुरक्षा, संवेदनशिल परिसर पेट्रोलिंग, पो. स्टे. मधील आरसीपी व क्युआरटी पथकाचा वापर करण्यात येणार आहे.




# अभिजीत अडसुळांची उच्च न्यायालयात धाव

## युवा स्वाभिमान ने महायुतीच्या नेत्यांची छायाचित्रे वापरल्याचा विरोध

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )-** महायुतीतील शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात भाजपच्या नेत्या नवनीत राणा यांनी थेट मैदानात उतरून प्रचार केल्याने महायुतीत संघर्ष टोकदार बनलेला असताना आता अभिजीत अडसूळ यांनी महायुतीच्या नेत्यांची छायाचित्रे वापरल्याबद्दल युवा स्वामिभान पक्षाच्या उमेदवाराविरूद्ध उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदिले यांनी स्वतऱ्च्या प्रचार फलकांवर महायुतीच्या नेत्यांचे छायाचित्रे वापरल्याचा आक्षेप अभिजीत अडसूळ यांनी घेतला आहे. अभिजीत अडसूळ यांनी यांनी यासंदर्भात याचिका दाखल केली असून या प्रकरणी त्यांनी निवडणूक आयुक्त, जिल्हाधिकारी अमरावती, दर्यापूर मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदिले यांना प्रतिवादी केले आहे.



याप्रकरणी अभिजित अडसूळ यांनी गेल्या 6 नोव्हेंबरला सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. अहवालानुसार संबंधित उमेदवाराकडून आदर्श आचारसंहितेचा भंग होत नसल्याचे दिसून येते, असे पत्र महायुतीचे उमेदवार अभिजित अडसूळ यांना सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने 9 नोव्हेंबरला दिले. अभिजित अडसूळ यांनी या पत्राचा आधार घेत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका दाखल केली आहे.

# बडनेरा आमदारांना करायचे काय होते आणि त्यांनी केले काय?



**जनतेला वेठीस धरले,**
**जिल्हा पेटवित ठेवला,**
**जमिनी घश्यात घातल्या**

**हनुमान चालिसा आंदोलन कुणासाठी ?**

**निवडणूकीनंतर पुन्हा टॅक्स वाढ नागरिकांच्या बोकांडी**

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.19 )- एखाद्या आमदाराला जेव्हा जनता निवडूण देते, तेव्हा तो त्या मतदारसंघाचा विकास करण्याकरिता कटीबध्द असला पाहीजे, जेणेकरुन निवडणूकीमध्ये मत मागताना मतदारांपुढे जाण्याकरिता त्याला नाक असली पाहीजे. परंतू बडनेराचे आमदार रवी राणा यांच्या बाबतीत असे काहीच घडले नाही. उलट त्यांनी राजकिय भांडणातून पाचही वर्ष जिल्हा पेटवित ठेवला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात राणा दाम्पत्याने राजापेठ उड्डाण पूलावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अनधिकृत पुतळा उभा केला. तत्कालीन पालकमंत्री यशोमती ठाकुर यांनी हा पुतळा महापालिकेला काढायला लावला. पुतळा काढला म्हणून रवी राणा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी तत्कालीन महापालिका आयुक्त प्रविण आष्टीकर यांच्या तोंडावर शाई फेकली. पुढचे महिनाभर राणा दाम्पत्यांनी याप्रकरणातून अमरावती जिल्ह्याला वेठीस धरले होते. परंतू जेव्हा अमरावती महापालिकेने येथील जनतेवर अन्यायकारक टॅक्स वाढ केली, तेव्हा एकदाही आंदोलन का केले नाही, किंवा या कारणाकरिता महापालिका आयुक्तांवर शाई का फेकली नाही ? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. आता फक्त या टॅक्स निवडणूकीपूरतीच स्थगिती आहे, टॅक्स वाढ रद्द झाली नाही. निवडणूक झाली की, पुन्हा हा विषयी नागरिकांच्या बोकांडी बसेल यात दुमत नाही.*

अमरावती शहरात ज्या पध्दतीने टॅक्स वाढ झाली आहे, या टॅक्स वाढविण्याच्या पापाचे वाटेकरी कोण? असा प्रश्न निर्माण होत आहे. सध्या महापालिकेमध्ये प्रशासक राज सुरु आहे, काही नागरिकांकडून टॅक्सची पठाणी वसुलीही झाली आहे, भविष्यातही ती होईल. खासदार, आमदार एकाच घरात असताना राणा दाम्पत्यांने याचा विरोध केला नाही. प्राप्त माहितीनूसार टॅक्स वाढीचा प्रस्ताव जेव्हा बनला, तेव्हा यांना दाखविण्यात आला होता, त्यांनी याला मान्यता दिली. यावर या दाम्पत्याने चकार शब्दही त्यावेळी काढला नाही. त्यानंतरही यावर तत्कालीन खासदार व विद्यमान बडनेराचे आमदार काहीच बोलले नाही, अमरावती, बडनेरा शहराच्या विकासासाठीचे राणा दाम्पत्यांनी आपले योगदान निश्चित करावे, महापालिकेचे सभागृह बर्खास्त झाल्यानंतर अनेक अवैध निर्णय महापालिका प्रशासकांनी घेतले. साफसफाई ठेका असो, नवाथे येथील मल्टीफ्लेक्स असो, या सर्व प्रकरणात आमदार- खासदार बोलले नाही. मातोश्रीसमोर हनुमान चालिसा म्हणण्याकरिता जसे तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याशी भांडण केले. तसे वाढलेल्या टॅक्ससाठी हे दाम्पत्य राज्य शासनाशी का भांडले नाही?

## महायुतीला मुर्ख बनवित आहेत राणा

एकीकडे महायुतीचे समर्थन घेवून रवी राणा बडनेरा मतदारसंघात अपक्ष लढत आहेत, तर दुसरीकडे तीन मतदारसंघात महायुतीचा उमेदवार पाडण्याकरिता पुर्ण ताकद लावित आहेत. नवनित राणा यांना 2014 आणि 2019 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी व पाठींबा दिला ही आमची सर्वात मोठी घोडचूक होती, अशी कबूली शरद पवारांनी लोकसभा निवडणूकीदरम्यान दिली होती. भविष्यात अशीच माफी मागण्याची वेळ भाजप नेते नरेंद्र मोदी, अमित शहा किंवा देवेंद्र फडणवीस यांच्यावर येईल यात शंका नाही. कारण 2014 ची स्थिती जशीच्या तशी येथे उभी ठाकली आहे, यावेळी फक्त राष्ट्रवादी काँग्रेसऐवजी भारतीय जनता पक्ष आहे. नवनित राणांसोबत रवी राणांनी भाजपमध्ये प्रवेश का नाही केला ?, हा कळीचा मुद्दा आहे, आणि त्याचे कारणही तसेच आहे. फक्त भाजप मतांचा वापर करण्याकरिता ते युवा स्वाभिमान पक्षावर लढत आहेत. असे भाजपच्या गोटातूनच बोलले जात आहे.वास्तवात नवनित राणा या भारतीय जनता पक्षाच्या मतांचा उपयोग हा बाहेरच्यांचे राजकारण स्थिर करण्याकरिता करतांना दिसत आहे. महायुतीच्या उमेदवारासमोर आपले उमेदवार उभे करुन ते त्यांनी सिध्द केले.

## भाजपचे 'युज अँड थ्रो' करायचे आहे ?

भाजपमध्ये पक्ष बदलून आलेल्या लोकांच्या पक्षनिष्ठ लोकांना लाखोल्या वाहाव्या लागत आहे, हे ही तेवढेच खरे आहे. उदाहरण द्यायचे झाले तर डॉ.सुनिल देशमुख काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेले. भाजपमधून आमदार म्हणून निवडून आले, त्याकरिता स्थानिक भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रचंड परिश्रमही घेतले. आता ते परत काँग्रेसमध्ये गेले. डॉ.अनिल बोंडेसुध्दा पुर्वी भाजपमध्ये होते. मग शिवसेनेत गेले. शिवसेना सोडून भाजपात आले आणि पुन्हा आमदार झाले. आता भाजपाचे खासदार आहेत. नवनित राणांचेही तसेच आहे. युवा स्वाभिमान, त्यानंतर सन 2014 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला, काँग्रेसचा पाठींबा घेवून खासदार झाल्या आता भाजपचा उमेदवारीवर लोकसभा लढल्या. तिवस्यामध्ये राजेश वानखडे शिवसेनेतून भाजपमध्ये आले. आता भाजपच्या उमेदवारीवर लढताहेत, यामध्ये भाजप मतदार नेहमी 'युज अँड थ्रो' होत आहे.

## भर रस्त्यात दहिहंडी कश्याकरिता

रवी राणा नेहमी अमरावतीकरांना वेठीस धरतात. नवाथे चौकात दरवर्षी दहिहंडीचे आयोजन करुन नागरिकांना वेठीस धरतात. त्यांच्या नामांकन रॅलीदरम्यान हा प्रकार पुन्हा समोर आला. राजापेठ उड्डाणपुलाखालून रॅलीचे आयोजन करुन नागरिकांना वेठीस धरले. शिवमहापुराणादरम्यानही कलश यात्रा काढून तेच केले. दादागिरी करुन नागरिकांना वेळोवेळी वेठीस धरणारे हे कसले लोकप्रतिनिधी. असा सवाल नागरिक करित आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अटीतटीच्या लढतीत कोण ठरणार सरस

## आठ विधानसभा मतदारसंघांत मैत्रिपूर्ण लढत, बंडखोरी, जुन्या-नव्यांचा संघर्ष

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )-** जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांमधील लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून बहुतांश ठिकाणी तिरंगी सामना आहे. दोन ठिकाणी महायुतीचे उमेदवार समोरा-समोर आल्याने उडालेला गोंधळ, सहा मतदारसंघांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीतील बंडखोरी यामुळे या




लढती अटीतटीच्या बनल्या आहेत.

### दर्यापूर | दर्यापुरात दुहेरी लढत



दर्यापूरात दुहेरी लढतीचे चित्र आहे. शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे गजानन लवटे हे रिंगणात आहेत. भाजपचे माजी आमदार आणि युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदिले यांचे उपद्रवमूल्य महायुतीसाठी अडचणीचे बनले आहे. असे असताना याचा फटका बसत अभिजीत अडसूळ हे तीन नंबरवर जात लवटे व बुंदिले अशी लढत होणार असल्याचे दिसत आहे.

### मेळघाट | भाजप-काँग्रेस थेट लढत



मेळघाटमध्ये प्रहारचे राजकुमार पटेल, भाजपचे केवलराम काळे आणि काँग्रेसचे डॉ. हेमंत चिमोटे यांच्यात सामना आहे. भाजपमध्ये बंडखोरी झाली आहे. लोकसभा निवडणुकीत या ठिकाणी भाजपला मिळालेले मताधिक्य ही जमेची बाजू असताना राजकुमार पटेल यांच्यासाठी ही लढाई प्रतिष्ठेची तर काँग्रेससाठी अस्तित्वाची बनली आहे.

### तिवसा | काँग्रेस विरुध्द भाजपमध्ये थेट लढत



तिवसामध्ये काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांच्या विरोधात भाजपचे राजेश वानखडे मैदानात आहेत. यशोमती ठाकूर यांच्यासाठी ही लढत अत्यंत महत्वाची असून त्या प्रचारात आघाडीवर आहे.

### अमरावती | काँग्रेस-राष्ट्रवादी समोरासमोर



अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या( अजित पवार) सुलभा खोडके, काँग्रेसचे डॉ.सुनील देशमुख, मनसेचे पप्पू पाटील आणि भाजपचे बंडखोर जगदीश गुप्ता यांच्यात मुख्य लढत आहे. या ठिकाणी अल्पसंख्यांक आणि कुणबी-मराठा मतांचा प्रवाह निर्णायक मानला जात आहे.

### बडनेरा | तिहेरी लढतीत प्रिती बंड मजबूत



बडनेरात युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांच्या विरोधात सर्व जण एकवटले आहेत. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे सुनील खराटे यांच्यासह भाजपचे बंडखोर तुषार भारतीय, शिवसेना ठाकरे गटाच्या बंडखोर प्रीती बंड, अपक्ष नितीन कदम यांनी रवी राणा यांना लक्ष्य केले आहे. ओबीसीमते या मतदारसंघात आजवर प्रभावी ठरत आली आहेत.

### अचलपूर | बच्चु कडू व बबलु देशमुखांमध्ये लढत



अचलपुरात प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू, काँग्रेसचे बबलू देशमुख आणि भाजपचे प्रवीण तायडे यांच्यात तिरंगी सामना आहे. भाजपचे बंडखोर ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांनी हिंदुत्वाचा झेंडा हाती घेतला असताना जातीय मतविभागणी कशा पद्धतीने होते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. मुस्लीम, कुणबी आणि माळी समाजाचे या ठिकाणी प्रभुत्व आहे.

### मोर्शी | घड्याळ विरुध्द कमळ



मोर्शीत राष्ट्रवादीचे (अजित पवार) देवेंद्र भुयार आणि भाजपचे उमेश यावलकर हे समोरा-समोर आहेत. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे गिरीश कराळे यांच्याविरोधात काँग्रेसचे बंडखोर विक्रम ठाकरे मैदानात आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीसमोर मतविभागणी रोखण्याचे आव्हान आहे. कुणबी, माळी आणि मुस्लीम मते निर्णायक आहेत.

### धामणगाव रेल्वे | काँग्रेस,भाजप, वंचित मध्ये लढत

मतदारसंघात भाजपचे प्रताप अडसड आणि काँग्रेसचे वीरेंद्र जगताप यांच्यात पुन्हा लढत होत आहे. गेल्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने या ठिकाणी 12 टक्के मते मिळवून काँग्रेसला धक्का दिला होता. यावेळीही वंचित आघाडीचे नीलेश विश्वकर्मा मैदानात आहेत. कुणबी आणि तेली समाजाची मते निर्णायक ठरणार आहेत.



# प्रस्थापितांना धक्का, पप्पू आमचा पक्का!

## मनसेच्या विजयासाठी अमरावतीकरांची वज्रमुठ

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )-** राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या अमरावती विधानसभा मतदारसंघात गेल्या अनेक वर्षापासून ठाण मांडून बसलेल्या प्रस्थापितांना यावेळी मात्र जोरदार धक्का देत 'आमचा पप्पू पक्का' असल्याच्या प्रतिक्रिया जनमानसामध्ये उमटत आहे. त्यामूळे मनसेचे पप्पू उर्फ मंगेश पाटील यांच्या विजयासाठी अमरावतीकरांनी वज्रमुठ बांधली असल्याचे दिसून येते.



अमरावती विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ही आतापर्यंत थेट होत होती. परंतु यावेळी मात्र राज ठाकरे यांनी आपल्या विश्वासू शिलेदाराला रणांगणात उतरविल्याने ही निवडणूक बहुरंगी झाली आहे. मनसेचे पप्पू उर्फ मंगेश पाटील यांच्यासारख्या नव्या दमाचा सशक्त व बलवान उमेदवार देत निवडणूक लढवीत रंग भरला आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे प्रारंभीपासून प्रस्थापित उमेदवारांच्या मनात धडकी भरली होती. पप्पू पाटील यांनी देखील अमरावतीचा विकास आणि हिंदुत्वाचा अजेंडा घेऊन आपले रेल्वे इंजिन वेगाने दामटल्याने संपूर्ण निवडणुकीचे चित्र बदलून गेल्याचे चित्र आहे.

पप्पू पाटील यांनी आपल्या जवळच्या सहकाऱ्यांना आणि विश्वासू कार्यकर्त्यांना एकत्र करीत एक चांगली फौज उभी केली. त्या मार्फत त्यांनी अतिशय शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा राबवीत आपला हायटेक प्रचार चालविला. सकाळ , दुपारी आणि सायंकाळी सभा तसेच कॉर्नर बैठक घेत पप्पू पाटील यांनी अमरावतीकरांसोबत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. शिस्तबद्ध व नियोजनात्मक प्रचारामुळे पप्पू पाटील अल्पावधीतच घराघरात पोहोचले, परिणामी त्यांच्या रेल्वे इंजिनने वेग घेत प्रचारात आघाडी घेतली. अमरावती शहराच्या विकासाबाबत असलेले व्हिजन, समस्यांची जाण आणि हिंदुत्वाच्या मुद्द्याबाबत असलेली स्पष्ट व कणखर भूमिका या पप्पू पाटील यांच्या जमेच्या बाजू ठरल्या असून आज प्रस्थापितांना धक्का आणि पप्पू आमचा पक्का अशा प्रतिक्रिया अमरावतीकर मतदारांमध्ये व्यक्त होत आहे.

### प्रचारात घेतली आघाडी

नामांकन दाखल करण्याच्या दिवसापासून पप्पू पाटील यांनी आपल्या शिस्तबद्ध व हायटेक प्रचारामुळे आघाडी घेतली असून ती शेवटच्या टप्प्यापर्यंत कायम असल्याचे दिसून येते. हिंदुत्वाचा सर्वात मोठा चेहरा असलेल्या राज ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी मनसेचे पप्पू पाटील यांना आमदार करणे गरजेचे असून आम्ही आता पक्का निर्धार केल्याने पप्पू पाटील यांचा विजय पक्का असल्याचा दावा अमरावतीकर जनतेने केला आहे.



# प्रिती बंड यांच्या 'ऑटो' चा विजयाकडे वेग

## बडनेरा मतदारसंघात परिवर्तनाची लाट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )-** जिल्ह्यातील सर्वात हॉट चर्चेचा मतदारसंघ म्हणून बडनेरा विधानसभा मतदारसंघाकडे बघितले जात आहे. या मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून दिवंगत माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी प्रिती बंड यांना सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. त्यांचे बोधचिन्ह असलेल्या 'ऑटो' ची ताकद दिवसागणिक वाढली आहे. हा ऑटो आता विजयाकडे वेग वाढवू पाहत आहे. उमेदवारी भक्कम झाली आहे. विशेष म्हणजे निवडणुकीच्या मैदानात असलेल्या अनेक अपक्ष उमेदवारांनी देखील उमेदवारी अर्ज मागे घेत त्यांना पाठिंबा दिल्यामुळे प्रिती बंड बडनेरा मतदार संघाच्या नव्या आमदार असतील अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे.

बडनेरा विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रिती संजय बंड याची उमेदवारी ही जनतेची उमेदवारी झाली असून त्यांच्याकरिता जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे. आपल्या रोजच्या कमाईचा एक भाग जनतेने प्रिती बंड यांच्या प्रचारात लोकवर्गणी म्हणून दिला



आहे. प्रिती बंड नावाचे वादळ विरोधकांना धूळ चारण्यासाठी बडनेरा मतदारसंघात घोंघावत आहे. त्यांच्या विजय आता निश्चित मानल्या जात आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे कर्तव्यदक्ष आमदार व संस्थापक अध्यक्ष बच्चु उर्फ ओमप्रकाश कडू यांनी घेतलेल्या जाहीर सभेत अनेक संघटनांनी आपले समर्थन प्रिती बंड यांना दिले. धनशक्तीविरुद्ध जनशक्ती याची ताकद दाखविण्याकरिता सर्व संघटनानी एकत्र येऊन विविध संस्था व संघटनांनी देखील मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने नावाजलेल्या संस्था, संघटना व अपक्ष उमेदवारांचा देखील समावेश आहे. बडनेरा मतदारसंघात ही परिवर्तनाची लाट असून प्रस्थापितांच्या पायाखालची वाळू पुर्णपणे सरकली आहे.

# तिवसा मतदारसंघात विकास पाहून मतदान

## यशोमती ठाकूर पुन्हा विजयाची मोहोर उमटविणार

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.20 )-** तिवसा विधानसभा मतदारसंघाचा विकास पाहूनच जनता पुन्हा एकदा मतदान करणार असल्याचे दिसत आहे. त्यामूळे फक्त विकासाच्या मुद्द्यावर राजकारण करणाऱ्या आ.यशोमती ठाकूर या पुन्हा एकदा विजयाची मोहार उमटविणार असल्याचे चित्र दिसत आहेत.

तिवसा मतदारसंघातून निवडणूक लढवीत असलेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांना अखिल भारतीय बारी समाज राजकीय विचारमंच यांच्या द्वारा बिनशर्त जाहीर पाठिंबा दिला. 20 नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये विविध संस्था व संघटनांनी काँग्रेसच्या फायरब्रँड नेत्या यशोमती ठाकूर यांना पाठिंबा दिला आहे. यशोमती ठाकूर यांच्या कामाची पद्धत त्यांचे सर्वांशी असलेलें सलोख्याचे संबंध यामुळे त्या या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेला आहे. समाजातील सर्व स्तरातून यशोमती ठाकूर यांना पाठबळ मिळत आहे. त्यामुळे बारी समाजाच्या एका शिष्टमंडळाने यशोमती ठाकूर यांची भेट घेऊन त्यांना अखिल भारतीय बारी समाज राजकीय विचार मंच जाहीर पाठिंबा दिला. बारी समाज एकजुटीने यशोमती ठाकूर यांचा प्रचार करून त्यांना प्रचंड बहुमताने विजयी करेल असा विश्वास विचार मंचचे सचिव संदीप सुने यांनी व्यक्त केला आहे. राजकीय विचार मंचचे अध्यक्ष मनोहर सुने,सचिव संदीप सुने, सल्लागार समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण टाँगासे व सचिव प्रभाकरराव ताडे यांनी जाहीर पाठिंबाचे पत्र यशोमती ठाकूर यांना दिले आहे.

# अबकी बार बबलू देशमुख अचलपूरातून हद्दपार?

## भाजपशी कथित हातमिळवणी ठरले 'गजकर्ण' | देशमुखांच्या पराभवाकरिता नाराज काँग्रेसीच लागले कामाला

***महासागर प्रतिनिधी***

***अचलपूर,( दि.19 )-** एकदा हात खाजविला तर पैसा येतो अशी धारणा असते, दोनदा हात खाजविला तर दुपटीने पैसा यावा अशी इच्छा असते, आणि तीनदा हात खाजविला तर ते गजकर्ण असू शकते रिस्क न घेता डॉक्टरकडे जाणेच योग्य ठरते. अचलपूर मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार बबलु देशमुख यांच्या बाबतीत नेमकं हेच घडताना दिसत आहे. बबलु देशमुख भाजपमध्ये जाणार या प्रकरणाचे 'बारसे' कथीत वाचाळवीर रवी राणा यांनी केले होते. त्यामूळे यामध्ये तथ्य नसावे असे वाटले. परंतू वारंवार देशमुखांवर भाजपशी हातमिळवणी केल्याचे आरोप होत गेले. आणि काँग्रेसच्या बाजूने बोलणारे विचारवंत श्याम मानवांनी तर त्यांना भाजप च्या स्लिपर सेल ची उपाधी दिली, हा प्रकार निष्ठावान काँग्रेसींच्या लक्षात आल्याने त्यांनी अचलपूरात बबलु देशमुखांविरोधात बंड पुकारले असल्याचे दिसत आहे. अचलपूर मतदारसंघात भाजप आणि काँग्रेस यांचे मधूर संबधांची चर्चा जनतेला 'गजकर्णा'सारखी भासत असल्याने 'अबकी बार बबलु देशमुख अचलपूरातून हद्दपार', हा नारा लावल्या जात आहे.*





एक व्यक्ती आपल्या कर्तव्याने मोठा होतो, एक व्यक्ती आपल्या कर्माने. तुमचे कर्म कसे आहे यावर त्या व्यक्तीचे भविष्य ठरते. मात्र कर्तव्य पाळणाऱ्या व्यक्तीचे भविष्य पारदर्शी असते. अचलपूर मतदारसंघातील विद्यमान आमदार बच्चु कडू हे आपल्या कर्तव्याने मोठे झाले आहे, तर बबलु देशमुख आपल्या कर्माने. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष किंवा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्षपद हे दोन पदे आपल्या ताब्यात कसे राहतील, बबलु देशमुख याकरिता अविरत झटले. परंतू आपण ज्या पदावर आहे, त्या पदाचे कर्तव्य ते विसरले, त्यामूळे मध्यवर्ती बँक त्यांच्या हातून गेली. या उलट बच्चु कडू यांनी प्रत्येक पद आपले कर्तव्य म्हणून निभावले. सत्तेत राहून गोरगरीबांचे काम होत नसेल तर 'सत्ता सोडा' ही भूमिका त्यांनी घेतली. स्थापण झालेल्या दुसऱ्या सत्तेत ते गेले आणि अत्यंत दुर्लक्षित गटात असलेल्या दिव्यांगाकरिता त्यांनी मंत्रालय मंजूर करुन आणले. मात्र त्या सत्तेतील लोकांचेही विचार पटले नाही, त्यांनाही सोडून बच्चु कडूंनी परिवर्तन आघाडीचा भाग होण्याचा निर्णय घेतला. हे सर्व करित असताना बच्चु कडूंवर 'खोके' घेतल्याचे आरोप झाले, मात्र बच्चु कडूंनी त्यात तथ्य नाही, हे सिध्द करुन दाखविले. याउलट बबलु देशमुखांनी भाजपशी सलगी केल्याचे आपल्यावर झालेले आरोप तथ्यहीन असल्याचे ते सिध्द करु शकले नाही. त्यांनी अजूनही श्याम मानवांना कोर्टात खेचले तर नाही, साधी नोटीसही त्यांना दिली नाही.

### 'बॅट' काँग्रेस, भाजपला पोहचविणार सिमेपार

निवडणूकीदरम्यान भाजपची वागणूक वारंवार काँग्रेस हितैषी दिसल्याने अचलपूरमध्ये भाजपमध्ये दोन गट झाले आणि काँग्रेसही दुभंगली. आता हे दोन्ही गट 'प्रहार' च्या पाठीशी उभे आहे. गलिच्छ राजकारणापेक्षा विकास आणि सत्य जेथे असेल त्यालाच आमचा पाठींबा म्हणत हे दोन्ही गट अपना भिडू, बच्चु कडू म्हणत मतदारसंघात घरोघरी 'बॅट' पोहचवित आहे. भाजप आणि काँग्रेसचे दोन्ही 'बॉल' अचलपूर मतदारसंघाच्या सिमेपार करण्याकरिता बच्चु कडूंनी पुन्हा एकदा आपली बॅट फिरवली आहे. ज्याचा येत्या 23 तारखेला कुणाला 'चौकार' आणि कुणाला 'षटकार' बसल्याचे दिसून पडेल.

### राणांनी केला धिंगाणा

अचलपूर मतदारसंघात यंदा बबलु देशमुखांना सुगीचे दिवस येणार अशी आशा होती. रवी राणा यांनी राजकारणातील कट्टर वैरी बच्चु कडू यांना मात देण्याकरिता 'भाजकाँग्रेस' ची वज्रमुठ बांधून प्रहार चे बुरुज कोसळवू अश्या आनाभाका घेतल्या. परंतू ऐनवेळी लग्नमंडपातून पळाल्याप्रमाणे देशमुखांना एकाकी करुन भाजप आपलाच संसार थाटण्याच्या प्रयत्नात असल्याने वऱ्हाडी म्हणी प्रमाणे 'बाई गेली, आणि बाईची वाकळं ही गेली' अशी परिस्थिती काँग्रेसची झाली आहे.

### देशमुखांनी संपविले देशमुखांचे राजकारण

माजी मंत्री राहीलेल्या वसुधा देशमुख यांच्या नावाचा काँग्रेसमध्ये सिक्का चालायचा. वसुधा देशमुख यांचा बच्चु कडूंनी दोन वेळा पराभव केला. मात्र या दोनवेळेच्या पराभवाचे कारण वरिष्ठांपुढे करुन बबलु देशमुखांनी त्यांची उमेदवारी आपल्या पारड्यात घेतली. बच्चु कडूंनी आतापर्यंत बबलु देशमुखांचाही दोनवेळा पराभव केला, असे असताना त्यांनी काँग्रेसकडून सलग तिसऱ्यांदा उमेदवारी मिळविली. दोनवेळा पराभवाचे तेच कारण पुन्हा बबलु देशमुखांनाही लागु पडायला पाहीजे होते. परंतू तसे झाले नाही. याचीच खंत मनात ठेवून काँग्रेसचा दुसरा गट बबलु देशमुखांना निवडून आणण्यापेक्षा त्यांना पाडण्यातच स्वारस्य मानत आहे.

# प्रहार कार्यकर्ता अभिजीत देशमुखांवर हल्ला

## रवी राणांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याची माहिती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 ) -** अपक्ष उमेदवार प्रिती संजय बंड यांचा प्रचार करित असलेले प्रहारचे कार्यकर्ते अभिजीत देशमुख यांच्यावर काही युवकांनी हल्ला चढविला. हे हल्ला करणारे युवक रवी राणा यांचे कार्यकर्ते असल्याचे माहिती अभिजीत देशमुख यांनी दिली. यावेळी हल्लेखोऱ्यांच्या हातात धारदार शस्त्र होते. परंतू ऐनवेळी पोलीसाचे वाहन आल्याने हल्लेखोर घटनास्थळावरुन पळून गेले. या घटनेचा व्हिडीओसुध्दा पुढे आला आहे.

प्रिती संजय बंड यांचा मौखिक प्रचार करत असताना मंगळवारी( दि.19) रोजी सायंकाळी 8 वाजताच्या सुमारास रवी राणांच्या कार्यकर्त्यांनी अभिजीत देशमुख यांना दस्तुर नगर चौकात अडविले. त्यांनी प्रिती बंड करु नको, असे म्हणत हल्ला चढविला. त्यातील काही लोकांच्या हातात धारदार शस्त्र होते. परंतू ऐनवेळी पोलीसाचे वाहन आल्याने हल्लेखोर तेथून पळून गेले असल्याची माहिती देशमुख यांनी दिली. राणा यांचा पराभव दिसत असल्याने विरोधक चवताळला असून प्रहार व प्रिती बंड यांचे कार्यकर्ते टार्गेट केले जात असल्याचे देशमुख यांनी सांगितले.